# विभागीय शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग,पुणे

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.०२०-२६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईटwww.dydepune.com


जा.क्र.शिउसं/स्वी.स./मा.अ/२०१९/७३८ दिनांक – 10 OCT 2019

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर

**विषय :- जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पद निर्देशित करणेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, प्राथमिक, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शाळेचे शाळा प्रमुख / मुख्याध्यापक हे जनमाहिती अधिकारी आहेत तर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) व विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे हे प्रथम अपिलीय अधिकारी आहेत. सदर प्रक्रिया ही केंद्रीय माहिती अधिकार २००५ अधिनियमच्या विसंगत आहे. तसेच ब-याच प्रकरणांमध्ये होणा-या राज्य माहिती आयोग, खंडपिठाच्या द्वितीय अपिल सुनावणीमध्ये होत असलेली कार्यवाही अधिनियमाच्या विसंगत असल्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, माहिती आयोग खंडपीठ, पुणे यांनी सदर बाब निदर्शनास आणून दिलेली असल्यामुळे हे कार्यालय पुन्हा जन माहिती अधिकारी, सहा.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यासंदर्भात पुढील प्रमाणे सूचना देत आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ (२००५ च्या अधिनियम क्र.२२) च्या कलम २ (ज) (दोन) अनुसार शाळा / कनिष्ठ महाविद्यालये **'सार्वजनिक प्राधिकरण'** आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधियिम २००५ च्या कलम ५ (१) अनुसार जन माहिती अधिकारी व सहा.जन माहिती अधिकारी तसेच कलम १९ (१) अनुसार प्रथम अपिलीय अधिकारी हे संबंधित सार्वजनिक प्राधिकरण कार्यरत असणे अपेक्षित असल्याचे निर्विवाद आहे.

शाळा / कनिष्ठ महाविद्यालये हे सार्वजनिक प्राधिकरण असल्याने व शाळा प्रमुख / मुख्याध्यापक हे त्या प्राधिकरणाचे प्रमुख असल्याने जन माहिती अधिकारी व सहा.जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करण्याचे अधिकार मुख्याध्यापक यांना आहेत. त्यानुसार मुख्याध्यापकांनी स्वतःला अथवा त्यांच्या अधिनस्त कर्मचा-याला जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करावे व आवश्यक असल्यास कलम ५ अनुसार सह.जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित / घोषित करावे.

मुख्याध्यापकांनी / कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचा-यांचे पदनिर्देशन जन माहिती अधिकारी म्हणून केल्यास मुख्याध्यापक / प्राचार्य हे कलम १९ (१) अनुसार प्रथम अपिलीय अधिकारी राहतील.



Scanned by CamScanner

परंतु मुख्याध्यापक / प्राचार्य हे स्वतः जन माहिती अधिकारी म्हणून घोषित असतील. त्यावेळेस प्रथम अपिलीय अधिकारी हे शाळा / कनिष्ठ महाविद्यालय ज्या संस्थेकडून चालविली जाते त्या संस्थेचे सचिव राहतील. (मुख्याध्यापक/प्राचार्य पदासाठी संस्था हे 'नियुक्ती व शिस्तभंग विषयक प्राधिकरण' आहे. )

उपरोक्त आदेशाचे आपल्या कार्यक्षेत्रात तात्काळ पालन करावे. खालील नमून्यात तात्काळ माहिती संकलीत करुन आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावी. तसेच सदर सुधारित माहिती प्रदर्शित करण्यासाठी आपल्या स्तरावरुन संबंधितांना आदेशीत करावे.

| अ.क्र. | पद | कर्मचा-याचे नांव |
|---|---|---|
| ०१ | जन माहिती अधिकारी | श्री./श्रीम.----------------------------------------<br>पदनाम - |
| ०२ | सहा.जन माहिती अधिकारी | श्री./श्रीम.----------------------------------------<br>पदनाम - |
| ०३ | प्रथम अपिलीय अधिकारी | श्री./श्रीम.----------------------------------------<br>पदनाम - |

(प्रविण अहिरे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा.माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग खंडपिठ, पुणे.
२. मा.संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा.संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव –

सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य (प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक) जिल्हा पुणे/अहमदनगर/सोलापूर



Scanned by CamScanner